।। श्रीपादश्रीवल्लभ प्रसन्न ।।

# कोकणबाग आमराई

नवजीवन विकास सेवा संस्था (रजि.नं 3931/महाराष्ट्र व एफ3918/2009)
रायपाटण ता.राजापूर,या सेवाभावी स्वयंसेवी संस्थेच्या गोशाळा आणि
शैक्षणिक उपक्रमांसाठी निधी संकलन उपक्रम.

## वाहतूक खर्चासह घरपोच हापूस आंबापेटी उपक्रम भेट योजना

(रु.५०००/- किंवा रु.७०००/- आणि रु.१०,०००/-
देणगी देऊन २ वर्षे, ३ वर्षे आणि ४ वर्षे विनामूल्य हापूस आंबापेटी)




Follow us on - konkanbag amrai

# आमराई योजना ठळक वैशिष्ट्ये

1) भारतातील व अनिवासी भारतीयांसाठी व कोणत्याही व्यक्तीला रु.5000/-(अक्षरी पाच हजार मात्र), रु.7000/-(अक्षरी सात हजार मात्र), रु.10,000/- (अक्षरी दहा हजार मात्र) भरुन या आमराई प्रकल्पात सहभाग घेता येईल.

2) सभासदाला एक हापूस आंबापेटी अनुक्रमे २,३,४ वर्षे वाहतूकखर्चासह विनामूल्य सप्रेम भेट पाठवली जाईल.

3) विविध स्वरुपाचा कोकणमेवा सवलतीच्या दरात ऑनलाईन /ऑफलाईन खरेदी करण्याची सुविधा.

4) 'नवजीवन अॅग्रो' फार्मची "अनपॉलीश्ड डाएट राइस", साजूक तूप (गीर, साहिवाल, थारपारकर या देशी गायींच्या दूधापासून हातरवीने केलेले), मँगोपल्प (मर्यादित साखर व आणि कृत्रीम रंग आणि वास-विरहीत) ही उत्पादने घरपोच सवलतीच्या दरात. (शेकडा २५% ते ४०%)

5) आपली आमराई-आपले दत्तक हापूस आंबा कलम कोणत्याही वेळी भेट देऊन पाहण्याची सुविधा !

6) आपल्या दत्तक झाडाखाली बांधलेल्या कठड्यावर पारावर/गोल रिंगवर आपल्या प्रिय व्यक्तीचे नाव स्मृतिप्रित्यर्थ देण्याची सुविधा उपलब्ध !

7) एकाच कुटुंबातील, नात्यातील कितीही व्यक्तींना सहभाग !




## कोकणबाग आमराई सोशलगार्डन !

# कोकणबाग आमराई-व्हाया कोकणब्रिज योजना 

**रु.5000/- ( रुपये पाच हजार मात्र),**
**रु.7000/- (रुपये सात हजार मात्र),**
**रु.10000/- (रुपये दहा हजार मात्र)**

**देणगीतून आंबापेटी**
**विनामूल्य वाहतूक खर्चासह घरपोच.**




**'कोंकण'** प्रदेशाचे नाव घेताच आठवण येते सुप्रसिध्द हापूसची !

कोकणातील राजापूर तालुक्यातील रायपाटण गावातील नवजीवन विकास सेवा संस्थेच्या मार्फत संस्था सक्षमीकरणासठी हा विश्वसनीय अभिनव उपक्रम सादर करीत आहोत. रुपये पाच हजार, सात हजार, दहा हजार मात्र रक्कम संस्थेला देणगी देऊन एक हापूस आंबा पेटी, विनामूल्य वाहतूक प्रवासखर्चासह सप्रेम देण्याची योजना आहे. ही योजना म्हणजे कोणतीही गुंतवणुक योजना, व्याजाची हमी देणारी दामदुप्पट देणारी स्कीम, मल्टीलेव्हल मार्केटींग स्कीम नव्हे. कोकणातील स्वयंसेवी अणि सेवाभावी नवजीवन सेवा संस्था (रजि.न.महा.3931/एफ3918 2009) या नोंदणीकृत संस्थेच्या विविध सेवाभावी उपक्रमांसाठी, प्रकल्पांसाठी निधी- दान योजना आहे. या कोकणबाग-आमराई-व्हाया कोकणब्रीज या योजनेत संस्थेचे देणगीदार, हितचिंतक आमच्या संस्थेचे पालक, सल्लागार, सध्याचे ग्राहक यांना सहभागी होता येईल.

**विनीयोग** संस्थेने या देणगीतून दोन आमराई कोकणात राजापूर तालुक्यात रायपाटण या गावी तयार करण्याचे नियोजन आहे. यापैकी एका बागेचे कामकाज 5000 हापूस आंबा कलमांची बाग या निधीतून करण्याचे नियोजन केले आहे.

**संकल्पना :-** कोकणतून देवगड (सिंधुदुर्ग), रत्नागिरी या दोन ठिकाणांहून जगभरात हापूस आंबा पाठवला जातो. कोकणातील हापूस आंबा म्हणताच अनेकांच्या तोंडाला पाणी सुटते, मात्र हापूस आंबा पेटीचे दर नेहमीच सर्वसामान्यांच्या पार आवाक्याबाहेर असतात. आंबा सीझनच्या अगदी शेवटलाही रु.500/- ते रु.700/-. प्रती डझन दर असतो. कर्नाटकी हापूसची भेसळ तर नित्याचीच गोष्ट आहे. सर्वसाधारणतः खालील 4/5 बातम्या वेगवेगळ्या स्वरुपात,
विविध प्रकारे आपण पाहतो-वाचतो-ऐकतो-सांगतो.........

## हापूस आंबा आणि बातम्या !

1) कोकणातील आंबा कल्टारयुक्त झाला...कार्बाईड/कार्बोक्झील पावडरने पिकवतात....केमीकल फवारण्यांचा अतिरेक वगैरे.
2) हापूस आंब्याची पारंपारिक चव गेली....फळांची साईझ घटली. तरीही डिसेंबर जानेवारीतली हापूस आंबा पेटी 25000/- (अक्षरी पंचवीस हजार रुपये मात्र) च्या वर दर घेते.
3) हापूस आंबा सर्वसामान्य ग्राहकांच्या आवाक्याबाहेर....आंब्याला सोन्याचा भाव....गरीबांचा हापूस आता श्रीमंताच्या घरी.
4) आंबा बाग - दलालांच्या ताब्यात - हापूस बागांतून शेतकरी लखपती - बागायतदारांची लाखो-करोडोंची उलाढाल वगैरे. शहरातील किंवा कोणत्याही मध्यमवर्गीयाला जमीन घेऊन हापूस कलमांची बाग करता येईलच असे नाही.

यातील बातम्यांतून तथ्य असो नसो. फळांच्या राजाचे आगमन होताच अन्य फळांचे बाजारभाव गडगडतात.आसमंतात हापूसचा मन धुंद करणारा, वेडावणारा सुगंध दरवळतो. प्रत्येकखवैय्याचे आंबा फळाशी नाते अगदी घट्टच! या सर्वांचा विचार करुनच नवजीवन विकास सेवा संस्थेने हापूस आंबा बाग 'आमराई' कोकणबाग नावाने आपल्या परिवारासमोर आणली आहे.

कोकणबाग आमराई

# अभिनव आंबा लागवड योजना – नियम व अटी.

**प्रास्ताविक :–** कोकणबाग आंबा लागवड योजना ही सामूहिक सहभागाची ,सर्वांच्या म्हणजेच कोकणातील हापूस आंब्यावर निरतीशय, निस्सिम प्रेम असलेल्या खव्वैयांनी स्वतःच्या देणगीतून साकार करावयाची आमराई योजना आहे. या अभिनव आंबा लागवड, हापूस कलम लागवड योजनेसाठी सहभाग घेताना किमान रु.5000/– (रुपये पाच हजार मात्र) तर कमाल रु.10,000/–(रुपये दहा हजार मात्र) रक्कम सर्वप्रथम भरावी लागेल.पुढे सहभागी व्यक्तींना दोन वर्षे, तीन वर्षे, पाच वर्षे एक आंबा पेटीसप्रेम भेट स्वरुपात प्रवासखर्चासह आहे. अशी संकल्पना आहे.

**नियम व अटी :–**

1) या योजनेत कोणत्याही भारतीय व अनिवासी भारतीय नागरिकाला पर्यायात दिलेल्या रक्कमेतील रक्कम भरुन सहभाग घेता येईल.

2) या योजनेत सहभागी होणाऱ्या व्यक्तीला ही रक्कम "नवजीवन विकास सेवा संस्था" (नोंदणी क्रमांक महाराष्ट्र 3931/एफ.3918 रत्नागिरी/2009) यांना देणगी म्हणून सदर रक्कम भरावी लागणार आहे.

3) कोकणबाग आमराई ही अभिनव हापूस आंबा कलम लागवड योजना ही कोणत्याही स्वरुपाची गुंतवणुक योजना, व्याजरक्कम प्रदान करणारी योजना, सभासदत्व योजना नसून कोकणातील "नवजीवन विकास सेवा संस्था" या नोंदणीकृत स्वयंसेवी संस्थेच्या सक्षमीकरणासाठी व बळकटीकरणासाठी निधी संकलन देणगी योजना आहे हे मान्य असलेल्या सामाजिक जाणिवेच्या व्यक्तींनाच या योजनेत सहभाग दिला जाईल.

4) "कोकणबाग आमराई, कोकणगेट व्हाया कोकणब्रिज थेट" ही अभिनव हापूस आंबा कलम लागवड योजना मर्यादित काळासाठी असून दोन वर्षे, तीन वर्षे, पाच वर्षे अशी या योजनेची मुदत राहणार आहे.

5) संयोजकानी निश्चित केलेल्या पर्यायांपैकी एक पर्याय निवडून त्यानुसार सदर रक्कम संस्थेला देणगी देऊन या योजनेतील सहभाग निश्चित करता येईल.

6) या अभिनव हापूस आंबा कलम लागवड योजनेतील सहभागी सभासदाला/व्यक्तीला त्याने दिलेल्या रक्कमेची पोचपावती लगेच संस्थेमार्फत दिली जाईल.

7) या योजनेतील सहभागानंतर नवजीवन विकास सेवा संस्थेमध्ये सभासदत्व, संचालकपद किंवा निर्णय प्रक्रियेत सहभाग, निवडणूक, आदी प्रकारे लाभ होणार नाही.

8) या अभिनव हापूस आंबा कलम लागवड योजनेतील सहभागी देणगीदाराला संस्थेचा वार्षिक अहवाल, मागील वर्षांचे लेखा परिक्षण अहवाल, ऑडिट रिपोर्टस आदी सर्व माहिती मागणीनुसार दिली जाईल. मात्र सदर माहितीसाठी संबधित देणगीदाराने आपली विनंती लेखी, तोंडी, मेसेज व ईमेलने केली पाहिजे. सदर माहिती अहवाल संस्थेच्या कार्यालयात विनामूल्य उपलब्ध पहावयाला उपलब्ध असेल. पोस्टाने हवी असेल.तर पोस्टेज शुल्क भरुन घेऊन त्यानंतरच दिली जाईल.

9) अट क्रमांक आठ मध्ये नमूद केलेली माहिती इलेक्ट्रॉनिक स्वरुपात स्कॅन केलेली असून ती वेबसाईटवर सर्वाना पाहण्यासाठी विनामूल्य उपलब्ध असणार आहे.

10) या योजनेतील एकाच कुटुंबातील कमीत कमी एक व जास्तीत जास्त कितीही जणांना सहभाग घेता येऊ शकतो , मात्र प्रत्येक सदस्याला स्वतंत्र रक्कम भरावी लागेल.

11) या योजनेतील सहभागी व्यक्ती एकाच कुटुंबातील असतील व राहण्याचे पत्ते वेगवगळे असतील तरी प्रत्येकाचा स्वतंत्र निवासाचा पत्ता देणे सहभागीवरती बंधनकारक राहिल.

12) या योजनेतील सहभागी व्यक्तीने आपला पत्ता, दुरध्वनी क्रमांक, घरी असण्याच्या वेळा आदी संपर्क व संवादाचा दुवा प्रतिवर्षी मार्च महिन्यात निश्चित करुन घ्यावयाचा असेल.

13) या योजनेतील सहभागी सभासद देणगीदारांना या योजनेत देऊ केलेल्या आंबा पेटीव्यतिरीक्त अन्य काही उत्पादने किंवा सुविधा विनामूल्य मिळणार नाहीत.

14) या योजनेतील सहभागी झालेल्या सभासद देणगीदार व्यक्तीला कृषीपर्यटन संस्थाभेट, भोजन किंवा वाहनव्यवस्था आदी सर्व स्वखर्चाने शुल्क देऊन करावे लागेल. योजनेत नमूद केलेल्या आंबा फळांशिवाय अन्य कोणतीही उत्पादने विनामूल्य उपलब्ध नसतील.

15) या योजनेतील सहभागी झालेल्या देणगीदाराला मुदत संपताच योजनेतून बाहेर पडावे लागेल. यानंतर योजना चालू ठेवणे किंवा बंद करणे संयोजकाच्या निर्णयावर अवलंबून असेल.

16) या योजनेतील सहभागी देणगीदाराचा या हापूस आंबा लागवड योजनेतील जमीन, पाणी किंवा कोणत्याही स्थावर मालमत्तेशी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष मालकी संबध वा अधिकार राहणार नाही.

17) या योजनेची सर्वस्वी अमंलबजावणी ही संयोजक संस्थेची जबाबदारी असणार आहे. या योजने विरोधात तक्रार करणे, अपप्रचार करणे अशा कोणत्याही कृतीमध्ये सहभागी होणार नाही अशा आशयाचे प्रतिज्ञापत्र सहभागी व्यक्तीला द्यावे लागेल.

सदर प्रतिज्ञापत्र स्वयंघोषणा स्वरुपाचे साधे प्रतिज्ञापत्रक असेल

18) या योजनेतील सहभागी झालेल्यांना, सर्व मंडळींना, सदस्यांना प्रतिवर्षी ठरल्याप्रमाणे आंबापेटी देणे बंधनकारक असले तरी भिषण वादळ, अवकाळी पाऊस, आटोक्यात व नियंत्रणात न आणता येणारे रोग, नियंत्रणाबाहरील विचित्र हवामान आदी कारण घडून आंबाफळे आलीच नाहीत तर योजना त्यावर्षापूरती स्थगित राहील. (उदा.Covid-19 कोरोना लॉकडाऊन )

**19) या योजनेतील सहभागी देणगीदाराने जर आपल्या हक्काची फळे व आंबा रस डबा जर कोणा अन्य व्यक्तीला, सभासदाला किंवा अनाथालय, सामाजिक संस्था, मंदिर संस्था–पुजारी, रिमांडहोम, रुग्णालय आदी ठिकाणी देण्यासाठी सुचवले तर संयोजक संस्था तशा प्रकारची व्यवस्था करील.**

20) या अभिनव आंबा लागवड योजनेत सहभाग घेतलेल्या व्यक्तीला १५ एप्रिल ते १५ जून या कालावधीत त्या व्यक्तीने दिलेल्या पत्त्यावर आंबा पेटी पोहोच केली जाईल.

21) या योजनेतील सहभागी झालेल्या वा प्रत्यक्ष सहभागी व्यक्तींची निवड सोडत रुपात, संगणकावर सोडत काढून एकूण कमीत कमी पाच व जास्तीत जास्त नऊ पाळयांमध्ये वितरण पूर्ण केले जाईल किंवा सोईनुसार पेट्यांचे वितरण केले जाईल.

22) सोडत व नावांची यादी वेबसाईटवर उपलब्ध केली जाईल. याशिवाय संबधित व्यक्तीला दूरध्वनी, व्हॉट्सअॅप, फेसबूक आदी माध्यमातून संपर्क केला जाईल. (मात्र कोणतीही पूर्वसूचना न देता संबधित व्यक्ती परगावी गेली किंवा संबधिताने काहीही न कळवता, कोणताही संवाद साधला नाही तर संस्था त्याची जबाबदारी घेणार नाही.)

23) या योजनेतील सहभागी झालेल्या व्यक्तीला कोणत्याही कारणास्तव सहभाग रद्द करता येणार नाही. मात्र आपले सभासदत्व हस्तांतरीत केले जाऊ शकते. या प्रक्रियेची माहिती संबधित व्यक्तीने संस्थेकडे देणे बंधनकारक राहिल.

24) या योजनेत सहभाग घेतलेल्या व्यक्तीने परस्पर सांमजस्य करारपत्र (M.O.U) सही व सांक्षाकीत करुन घेणे बंधनकारक राहिल. या परस्पर सामंजस्य करारपत्रकाची प्रत संयोजक संस्था व सहभागी व्यक्ती या दोहोंकडे राहिल.

25) या योजनेत सहभाग घेणाऱ्या व्यक्तीचे छायाचित्र, त्या व्यक्तीचा अनुभव आदी संयोजक नवजीवन विकास सेवा संस्था या योजनेच्या प्रसिध्दीसाठी खाजगी किंवा सार्वजनिकरित्या वापर करु शकेल. काही अपवादत्मक कारणामुळे असे नको असेल तर तसे संबधिताने कळवणे बंधनकारक असेल.

26) ही कोकणबाग आमराई अभिनव हापूस आंबा कलम लागवड योजना आपण सहभाग घेतल्यापासून सलग दोन, तीन, चार वर्षे सुरु राहिल व तशा आशयाचे प्रतिज्ञापत्र की जे स्वयंघोषणापत्र स्वरुपात करुन सत्यप्रत केलेली असेल, त्यावर या योजनेच्या अमंलबजावणीकार

संयोजक श्री.महेश लक्ष्मण पळसुलेदेसाई यांची स्वाक्षरी व फोटो यासह सहभागी देणगीदाराला देणगी रक्कम पोहोच होताच सात दिवसांतच दिले जाईल.

27) कोकणबाग आमराई या योजनेतील स्थावर जमीन ही मालक व जमीनदार श्री. महेश लक्ष्मण पळसुलेदेसाई असून सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून त्यांनी पंचवीस वर्षे विनामूल्य व कोणत्याही जाचक अटी व शर्ती, नियम न घालता नवजीवन विकास सेवा संस्थेला लागवड करा–उत्पादन घ्या व परत करा अशा अटीवर पंचवीस वर्षे कराराने दिली आहे. (कराराची प्रत कार्यालयात उपलब्ध असून ती केव्हाही प्रत्यक्ष भेटीत पाहता येईल.)

28) कोकणबाग हापूस आमराई या अभिनव आंबा कलम लागवड योजनेतील आंबा बागेतून येणारे उत्पन्न हे नवजीवन विकास सेवा संस्थेच्या बळकटीकरणासाठी वापरले जाईल.

29) कोकणबाग आमराई या योजनेतील वर्षे ५ व्या ते पुढील या कालावधीत संपूर्ण उत्पादन नवजीवन विकास सेवा संस्था स्वतःसाठी वापरणार असून त्या उत्पन्न रक्कमेतून संस्था स्वतःच्या विविध सेवाभावी प्रकल्पांना व उपक्रमांना खर्चाची तरतूद करील.

30) या कोकणबाग आमराईबाबत कोणताही न्यायालयीन विषय निर्माण होणार नाही मात्र एखाद्या अपप्रवृत्तीने काही तसा विषय झालाच तर तो राजापूर व रत्नागिरी न्यायालय कार्यकक्षेत सोडवला जाईल.

31) योजनेचा कार्यकाळ संपल्यानतर 25 वर्षानंतर सदर कोकणबाग आमराई मूळ जमीन मालकाला परत केली जाईल व प्राप्त तत्कालीन परिस्थितीनुसार निर्णय घेतला जाईल.






## आमच्या उपक्रमाची अंमलबजावणी अशी असेल

आम्ही, आपले आमच्या कोकणबाग आमराई या उपक्रमात सहर्ष व मन:पूर्वक स्वागत करीत आहोत. आपण देत असलेल्या बहुमोल अशा रु.5000/-रु, 7000/-रु, 10,000/- या मौल्यवान देणगीमुळे, आम्ही आपणाला रक्कम भरल्यापासून सलग दोन, तीन, चार वर्षे हापूस आंबा पेटी आपणाला प्रवासखर्चासह विनामूल्य आपल्या घराच्या शेजारील एस. टी. डेपोमध्ये पाठवली जाईल.

## (उपक्रमाची अंमलबजावणी अशा प्रकारे होईल.)

1) आपली देणगी आम्हाला पोहोचताच आपणाला पोचपावती, परस्पर सामंजस्य करारपत्रक,उपक्रम आयोजकाकडील प्रतिज्ञापत्र कुरीअरने आणि पर्याय निवडीनुसार आंबापेटी घरपोच येईल. व्यावहारीक आणि परस्पर संबंधाने आंबापेटी एस.टी. पार्सलने अथवा ट्रान्सपोर्ट सेवेमार्फत सदस्याच्या घराच्या आसपास पाठवली जाईल.

2) आपले नाव, गाव पत्ता आणि आपण परवानगी दिल्यास आपला दूरध्वनी, मोबाईल वेबसाईटवर टाकला जाईल. (अन्य सहभागी सभासदांना आपल्यासह अन्य कोण आहे? उपक्रम विश्वसनीय चालू आहे का नाही हे यातून कळेल याशिवाय सदस्यांचा व्हॉटसअॅप फेसबुक समूह सोशल मिडीयावर तयार केला जाईल.)

3) प्रतिवर्षी 15 एप्रिल ते 15 जून या दरम्यान उपक्रमात सहभागी असलेल्या सर्व सभासदांना आंबापेटी साठी निवडलेल्या 3 पर्यायांपैकी पसंतीनुसार फळे भरुन घरपोच दिली जाईल.

4) आपणापर्यंत हापूस आंबा पेटी पोहोच होण्यासाठी पोस्ट पार्सल, कुरीअर, ट्रान्सपोर्ट, (लागू असेल त्याप्रमाणे) प्रत्यक्ष वाहनाद्वारे आंबा पेटी पोहोच केली जाईल.

**विशेष नोंद : आंबापेटी पोहोच करताना परस्पर संवाद, संपर्क दोन्ही कडील सोयी लक्षात घेऊन निर्णय व अंमलबजावणी केली जाईल.**

# विनामूल्य आबांपेटी आमच्या उपक्रमाची काही ठळक वैशिष्टये

केवळ 5000/-रु, 7000/-रु, 10,000/- रुपये देणगी देऊन रक्कम देणगी दिल्यापासून अनुक्रमे 2,3,4 वर्षे सलग आंबापेटी विनामूल्य प्रवासखर्चासह घरपोच भेट.

कोकणातील राजापूर (रायपाटण) येथील आमच्या बागेतील रसायनमुक्त, खतविरहीत रासायनिक विषारी फवारण्यांविना, कल्टारमुक्त हापूस आंबाफळे!

वर्षभर आणि उपक्रमाच्या मुदतकाळात आपल्या हापूस आंबा कलमाला, बागेला वर्षातून कितीही वेळा भेट देण्याची सोय

आपल्या देणगीतून सामाजिक बांधिलकी जपत, नैसर्गिक मधुर चवीच्या विषमुक्त हापूस आंबा फळांचा स्वाद !

सामाजिक उपक्रमात सहभाचा सुखद अनुभव !

## स्मरणार्थ हापूस आंबा कलम दत्तक योजना

आपण आमच्या कोकणबाग आमराईत आपल्या दिवंगत प्रिय व्यक्तीच्या स्मरणार्थ हापूस आंबा कलम दत्तक घेऊ शकता, किंवा आपण आपल्या मित्र, पत्नी, नातेवाईककिंवा स्नेही व आप्तेष्ट यांच्या स्नेहासाठी आमच्याकडे हापूस कलम दत्तक घेऊशकता. आपण ज्यासाठी हे आंबा कलम दत्तक घेतलेले असेल त्या कलमाच्या खाली चबुतरा किंवा गोलाकार डेरेदार अळ्यावर संबधिताचे नांव ठळक कोरले जाईल. हयात असलेल्या व्यक्तीला दिलेल्या पत्त्यावर कलमाचे फोटो व फळेही पाठवली जातील.आपण कोणाच्या स्मरणार्थ ही फळे कोणत्याही संस्थेला किंवा अनाथालय, मंदिर, महिलाश्रम किंवा विद्यार्थी वसतीगृहाला पाठवायला सांगितल्यास आम्ही त्याप्रमाणे फळे पाठवून अंमलबजावणी करु...सामाजिक बांधिलकीची गोड फळे यापेक्षा आणखी ती कोणती ?

कोकणबाग
आमराई

# रु.5000/– रु.7000/– व रु.10,000/– देणगीतून मिळणारी आंबापेटी

| अ.क्र | भरावयची रक्कम | आंबापेटी मिळण्याची मुदत | फळांची संख्या | उपलब्ध सेवा व सवलती |
| --- | --- | --- | --- | --- |
| 1 | 5000/–रु अक्षरी पाच हजार मात्र | रक्कम भरल्या वर्षापासून सलग 2 वर्षे | चार डझन पेटी – 2 वर्षे | या पर्यायातील सभासदाला आमची इतर सर्व उत्पादने सवलतीच्या दराने मिळतील. M.R.P वर 25% |
| 2 | 7000/–रु अक्षरी सात हजार मात्र | रक्कम भरल्या वर्षापासून सलग3 वर्षे | चार डझन पेटी – 3 वर्षे | या पर्यायातील सभासदाला आमची इतर सर्व उत्पादने सवलतीच्या दराने मिळतील. M.R.P वर 30% |
| 3 | 10,000/–रु अक्षरी दहा हजार मात्र | रक्कम भरल्या वर्षापासून सलग 4 वर्षे | चार डझन पेटी – 4 वर्षे | या पर्यायातील सभासदाला आमची इतर सर्व उत्पादने M.R.P वर 40% सूट व सशुल्क घरपोच मिळतील. |

# मँगोपल्प

## (कृत्रीम रंग, कृत्रीम वास विरहीत)

आमच्या स्वतःच्या हापूस आंबा बागेतील फळे, आम्ही आमच्या अनुभवी, व्यावसायीक कौशल्यातून निवडलेल्या, देवगड, राजापूर, रत्नागिरी येथील निवडक फळांपासून बनवलेला 'मँगोपल्प' 2 वर्षे निर्धोक टिकण्याची क्षमता! वर्षभर जिभेवर रेंगाळत राहणारी चव !




# काजूगर (ड्रम रोस्टेड)

नैसर्गिकरित्या आगीत, चुलीवर भाजलेले आणि बॉयलर प्रक्रियायुक्त
काजूगर उत्पादन केल्यापासून (उपलब्धतेनुसार)10 दिवसांत ऑर्डरप्रमाणे मिळतील



# कुळीथपीठ / नाचणी पीठ व नाचणी

आमच्या परिसरातील नैसर्गिक शेतीतून पिकवलेली
नाचणी, कुळीथ विक्रीसाठी उपलब्ध



# कणीदार "संपूर्ण शुध्द तूप"

### देशी गाईच्या नैसर्गिक दूधापासून निर्मिती केलेले



## नैसर्गिक पद्धतीने केलेले, पारंपारिक संपूर्ण तूप

आपल्या भारतीय गाईला आयुर्वेदाने फार मानाचे स्थान दिलेले आहे. गाईच्या तूपाला तर आयुर्वेदात अनन्य साधारण महत्व आहे. मात्र आपणाला सध्या बाजारात प्राप्त होणरे तूप हे यंत्रावर कलेले असते. क्रीम सेप्रेटर यंत्रावर कच्चा दूधावर प्रक्रिया करुन किंवा मान्य पद्धतीने तूप तयार केले जाते आम्ही आमच्या गोशाळेत भारतीय दुधाळ गाई गीर जातीच्या पाळतो.

या भारतीय गाई पौष्टिकता व सकसता यासाठी जगप्रसिद्ध आहेत. भारतीय गाईचे दूध एटू या गटातील आहे. (जिज्ञासूंनी एटू दूधाच्या माहितीसाठी आम्ही प्रकाशीत केलेला गोवर्धन हा अंक अभ्यासावा.)

साधारणत: 1993 सालापर्यंत जगाला भारतीय गाय व युरोपीयन गाय यातील फरक माहित नव्हता. 1993 साली न्यूझीलंडच्या शास्त्रज्ञ बॉब इलीयाट यांनी भारतीय गाईच्या दूधाचे सर्वश्रेष्ठत्व शास्त्राच्या कसोटीवर सिद्ध केले. जगाला यावेळी (1993 साली) A1 म्हणजे विषारी वा पुतना मावशीचे दूध व A2 म्हणजे अद्वितीय दूध वा अमृततुल्य दूध याचे महत्व कळाले. आज आपणाला भारतीय गाईच्या दूधाचे महत्व पुरेसे अजूनही कळालेले नाही. भारतीय गाईच्या दूधापासून केलेले तूप कोलॅस्टेरॉलला निमंत्रण देत नाही. आयुर्वेदाच्या अनेक औषधांसाठी गाईचे तूप गरजेचे असते.

आम्ही आमच्या गोशाळेतील गायींपासून काढलेल्या दूधाला शेणाच्या गोवरी, लाकडे यावर तापवून भाकरीसारखी घट्ट साय काढतो.लाकडी खांबाला चिनी मातीच्या बरणीत व माठात घुसळून लोणी काढले जाते. हे लोणी 10 ते 15 वेळा स्वच्छ धुवून त्यापासून कणीदार तूप तयार केले जाते. तूप तयार करताना स्वच्छतेचे नियम, गुणवत्ता नियंत्रण यासाठी काटेकोर लक्ष पुरविले जाते.आम्ही सर्व दूधाला सायीसह विरजण लावतो. (काहीजण फक्त सायीला विरजण लावतात.) संपूर्ण तूप हे नाव यामुळेच आहे. हे तूप आरोग्याला उपायकारक आहे. शरीराची प्रतिकारशक्ती भारतीय गाईच्या तूप सेवनाने वाढते. तूप खाणे व रुप येणे ही लोकभाषेतील उक्ती आपणाला माहित आहेच.

**आपण आम्हाला आपल्या घरी पवित्र मंगल विधी, मंगलसंस्कार, काही खास भोजन प्रसंग असेल तर वा औषधासाठी आमच्याकडून आपण तूप मागवू शकता**

## 'नवजीवन ॲग्रो' कडील वैशिष्टयपूर्ण उत्पादने

# अनपॉलीश्ड डाइट राईस


### पॉलीश न केलेला पौष्टीक तांदूळ

**गोमय शेती आधारित नैसर्गिक शेती करुन केलेला 'ब' जीवनसत्वयुक्त पॉलीश न केलेला पौष्टीक तांदूळ.**

कोकणातीलच नव्हे तर अवघ्या भारतात तांदळापासून केलेला भात हे मुख्य अन्न मानले जाते, मात्र भात (धान) भरडल्यावर तांदूळ पांढरा शुभ्र दिसावा म्हणून दोनदा वा तिनदा पॉलीश केला जातो. या प्रकारात तांदळातील पोषक अन्नसत्वे नष्ट होतात. मुळातच भात पिक जास्त यावे म्हणून रासायनिक खतांचा भडिमार केला जातो. जमिन नापीक होते संस्थेने शेतकरी वर्गात जागृतीसाठी काही कार्यशाळा घेतल्या. आम्ही आमच्या नमूना प्रक्षेत्रावर (50 एकर) भात शेती करण्याचे ठरवून ही भातशेती गोमय आधरीत म्हणजेच गायींच्या शेणखताचा व गोमूत्राचा वापर करुन केली आहे. आम्हाला पिकाच्या उत्पादकतेत फारच फरक पडलेला दिसला.

आमच्या तांदळाचे वैशिष्टय असे की, यात आपणाला 'बी' जीवनसत्व पुरेपुर प्रमाणात मिळते. बी जीवनसत्वाच्या जातकुळीतील उर्वरीत सर्व घटक आपणाला पुरेपुर प्रमाणात मिळतात. यामुळेच थोडासा हातसडीच्या तांदळाचा भात खाल्ला तरी पोट भरल्यासारखं वाटतं. पांढराशुभ्र भात कितीही खाल्ला तरी पोट भरण्याची भावना होत नाही ती याचमुळे.आपण पॉलीश करुन त्यातील तमाम जीवनसत्वांचा नायनाट करतो. आम्ही या तांदळाला याचसाठी पॉलीश न करता आमच्या ग्राहकांना देतो. इस्कॉन, विविध दत्तमंदिरे आणि काही खाजगी ग्राहक आमचा तांदूळ पसंद करतात. डॉ. अभय धुळप (रत्नागिरी) (एम.डी.आयुर्वेद सुवर्णपदकप्राप्त) यांनीही आमच्या तांदळाचा गौरव केला आहे. भात थोडा करडा व चॉकलेटी झाला तरी चालेल. आपण सकस व पौष्टीक खाऊया अशी आपली धारणा असेल तर
आपणाला आमचा "अनपॉलीश्ड डाइट राईस"नक्कीच आवडेल!

**(गोमय शेती आधारित नैसर्गिक शेती करुन केलेला पॉलीश न केलेला पौष्टीक तांदूळ आपणाला आवडेल असा आम्हाला विश्वास आहे)**





## शालेय शैक्षणिक साहित्य वितरण, गरजूंना मदत 'वयम आणि 'साधना या बालविशेष अंकाचे "वसा वाचनाचा" उपक्रमाअंतर्गात संपूर्ण कोकणात विनामूल्य वितरण, आर्थिक साक्षरता, संगणक तंत्रज्ञान प्रशिक्षण, 4 थी, 7 वी शिष्यवृत्ती मार्गदर्शन आदी उपक्रमांसाठी नावाजलेली स्वयंसेवी संस्था

निसर्गसंपन्न व समृध्द असलेल्या रत्नागिरी जिल्ह्यातील धडपडणाऱ्या युवकांच्या व शिक्षकांच्या चवळीला आलेलं मूर्त स्वरुप म्हणजे 'नवजीवन विकास सेवा संस्था'. रायपाटण या राजापूर तालूक्यातील प्रगतशील गांवात संस्थेची 26 नोव्हेंबर 2009 रोजी नोंदणीकृत होऊन स्थापना झाली. (रजि.नं. 3931/महाराष्ट्र-रत्नागिरी) सुरुवातीच्या काळात म्हणजे 1999 ते 2004 दरम्यान 'आर्यादुर्गा' अभ्यास परिवार या नावानं इ. 4 थी, इ 7 वी. शिष्यवृती परीक्षांसाठी संपूर्ण रत्नागिरी जिल्ह्यात शिक्षक प्रबोधन, जाणीव जागृती व्याख्याने, प्रश्नपत्रिका निर्मिती आदी उपक्रम संस्थेने केले. शिक्षण आणि शेती ही दोन क्षेत्रे संस्थेच्या केंद्रस्थानी असून 'शिक्षणातून शेतीकडे व शेतीतून शिक्षणाकडे' अशी संस्थेची मनोधारणा आहे. बदलत्या कोकणच्या पार्श्वभूमीवर उत्पादक व नगदी पीकांच्या माध्यमातून शेतकरी प्रशिक्षण, प्रात्यक्षिके,दत्तक गाव, भारतीय गोवंश संवर्धन, संगणक व्यवहार आणि आनंददायी, प्रकल्पाधारीत शिक्षण या माध्यमातून संस्था समाजाला सोबत घेत वाटचाल करीत आहे



सांगली येथील लुल्ला ट्रस्ट आयोजित सेवा 2015 मधील सहभाग.


रायपाटण शाळा नं. 1 येथील शालेय शैक्षणिक साहित्य वितरण.


रत्नागिरी जिल्हा मध्यवर्ती सह. बँकेचे अध्यक्ष श्री. तानाजीराव चोरगे यांची संस्थेला भेट.



पुणे येथील गोपालन कार्यशाळेतील परिसंवाद.


विश्वनाथ विद्यालय राजापूर येथील वयम व साधना अंकांचे वसा वाचनाचा उपक्रमातील वितरण.


नानावटी रुग्णालय व इंडियन ऑइल मुंबई यांचेसह आयोजित रायपाटण येथील रुग्णसेवा शिबिर

शिक्षण : ज्ञान दिल्याने ज्ञान वाढते – सत्य शिवाहून सुंदर हे, त्या ज्ञानाचे मंदीर हे ! कोकणातील गावागावातून बदलत्या शिक्षणपध्दतीचे प्रतिबिंब,शाळांशाळात पडते. चकाचक देखण्या, सुंदर शाळा, चैतन्यानं रसरसलेल्या उत्साही, आनंदी मुलांचे परिसर विकास प्रकल्प, या सर्वांमधून ज्ञानमंदिरे संगणक व तंत्रज्ञान युगाला सामौरा जात आहेत. रेल्वेत बसण्याची असो वा विमानात बसण्याची, आधुनिक प्रकल्पात वा बँकांत नोकरीपासून स्वत:उद्योजकघडवण्याची क्षमता, पात्रता ज्या शिक्षणामुळे येते त्या शिक्षणपद्धतीत काही नवे उपक्रम करण्याचा प्रयत्न करीत आहे.

1) देवळातील फारशी, सोन्याचा कळस याप्रमाणेच शाळेतील संगणकही गरजेचा ह्या मनोधाणेसाठी पालक प्रबोधन शिबिर घेणे.
2) 21 व्या शतकात ज्ञानाधारीत, तंत्रज्ञान युगात भारत महासत्ता बनणार हे गृहित धरुन पाटीवर, भिंतीवर, कागदावर जशा रेघोट्या, फराटे, अक्षंर उमटतात तशी करामत संगणकावर व्हावी यासाठी विद्यार्थी व शिक्षकांसाठी संगणक शिबिरांचे आयोजन करणे.
3) तणावरहित-पांरपरिकता सोडून 'धोका व ओका' ही चाकोरी मोडून विद्यार्थ्यांसाठी नाविन्यपूर्ण, आनंददायी उपक्रमांचे, छंदवर्गाचे आयोजन करणे.
4) पालकांचे दबावगट, प्रबोधनगट, संस्कार शिबिरे, विज्ञान प्रदर्शने अदी उपक्रम आयोजित करणे.
5) स्पर्धा परीक्ष, शिष्यवृत्ती परीक्षा या विशेष उपक्रमांतून विद्यार्थांना आधुनिक स्पर्धात्मक युगासाठी तयार करणे
6) बदलेल्या तंत्रज्ञानानुसार वेगवान युगातही मातृभाषा मराठी संगणकावर सहजगत्या वापरण्यसाठी मुलांना पालकांना तयार करणे. शिक्षकांसाठी 'युनीकोड', 'इनस्क्रिप्ट की बोर्ड' वापर प्रशिक्षण आयोजित करणे.
7) विज्ञानजागृती, विज्ञानजाणीव, वाचनमाला, वक्तृत्व, निबंध लेखन कार्यशाळा कथाकथन आदी उपक्रम तज्ज्ञ मार्गदर्शकांच्या मदतीने आयोजीत करणे.

कोकणबाग आमराई

नवजीवन विकास सेवा संस्था या स्वयंसेवी संस्थेच्या सेवाभावी उपक्रमांसाठी
निधी उभारणीसाठी अभिनव सामाजिक आमराई प्रकल्प

कोकणात 25 एकर जागेवर साकार होणारा 5000 (पाच हजार)
हापूस आंबा कलमांची कोकणबाग आमराई.





केवळ रुपये पाच हजार, सात हजार, दहा हजार देणगी देऊन कायमस्वरुपी
एक हापूस आंबापेटी विनामूल्य वाहतूक प्रवासखर्चासह मिळणार !

**आमचा संपर्क – आमच्याशी संवाद**

कोकणबाग आमराई

**नवजीवन विकास सेवा संस्था**
**मु. पो. रायपाटण, ता. राजापूर, जि. रत्नागिरी**

8275134762 info@nvssindia.com

Website :nvssindia.com www.konkanbag.com www.godan.in

Follow us on Navjeevan vikas seva sanstha

Created by ENKLAT creation 8879922016

## Our Bank Details

| | |
|---|---|
| BANK NAME | **BANK OF INDIA** |
| BRANCH | PACHAL, TAL :- RAJAPUR, DIST. :- RATNAGIRI, PIN 416706 |
| ACCOUNT NAME | **NAVJEEVAN VIKAS SEVA SANSTHA** |
| ACCOUNT NO. | **141910110003952** |
| IFSC CODE | BKID0001419 |
| ACCOUNT TYPE | SAVING |